—: प्रेसनोट :— दि. १६/०१/२०२०

फिर्यादी यांची रूम खरीददार यांचे नावे होणेकरीता लोकसेवक यांनी फिर्यादीकडे रूपये १०,०००/— इतक्या लाचेची मागणी केली. म्हणून फिर्यादी यांनी लोकसेवक यांचे विरूध्द ला.प्र.वि, वरळी, मुंबई कार्यालयास लेखी तक्रार दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून लोकसेवक यांचे विरुध्द केलेल्या पडताळणी/सापळा कारवाई मध्ये लोकसेवक महेश श्रीकांतराव देशपांडे यांनी मोबदला/बक्षीस स्वरुपात फिर्यादीकडे रूपये २०,०००/— इतकी लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रुपये १०,०००/— इतक्या रक्कमेची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०२/२०२० |
| कलम | ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | महेश श्रीकांतराव देशपांडे, वय ३९ वर्षे धंदा—नोकरी (सहाय्यक, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, म्हाडा, बांद्रा पुर्व, मुंबई.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे मालकीचे कृष्ण निवास, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई येथे असलेल्या रूम नं. ४११ व ४१२ त्यांनी त्यांचे शेजारी व भाची यांना विक्री केल्याने सदरच्या रूम फिर्यादी यांचे नावावरून खरीददार यांचे नावे करण्याकरीता फिर्यादींनी दिलेल्या अर्जावरील कार्यवाही आलोसे महेश देशपांडे यांचे कार्यालयात प्रलंबित होती. फिर्यादी यांचे रूम खरीददाराच्या नावे होणेकरीता आलोसे यांनी फिर्यादीकडे रूपये २०,०००/— इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली. फिर्यादीस लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष येवुन दिनांक ०९/०१/२०२० रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १३/०१/२०२० रोजी लोकसेवकाचे कार्यालयात पंचासह पडताळणी केली. आज दिनांक १६/०१/२०२० रोजी लोकसेवकाने सापळा कारवाईच्या वेळी फिर्यादीकडून रूपये २०,०००/— इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये १०,०००/— इतकी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

अपर पोलीस उप आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( वंदना मारकर )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारासंबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क**:—लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईलॲप :www.acbmaharashtra.net

Scanned by CamScanner